आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२१ ऑक्टोबर २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- विधानसभा निवडणुकीची अधिसूचना उद्या प्रसिद्ध होणार, उद्यापासून २९ ऑक्टोबरपर्यंत भरता येणार उमेदवारी अर्ज
- मनसे, वंचित बहुजन आघाडी, परिवर्तन महाशक्तीकडून विविध उमेदवारांची घोषणा
- महाविकास आघाडीत ३० ते ४० जागांवर चर्चा सुरू, रामदास आठवले यांच्याकडून महायुतीकडे ५ ते ६ जागांची मागणी

  **आणि**
- गडचिरोलीमध्ये भामरागड तालुक्यात पोलिसांबरोबरच्या चकमकीत ५ नक्षलवादी ठार

<><><><><>

राज्य विधानसभा निवडणुकीसाठी अधिसूचना उद्या प्रसिद्ध होणार असून त्यासोबतच अर्ज भरायला सुरुवात होणार आहे. २९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. या अर्जांची छाननी ३० ऑक्टोबरला होईल आणि ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. २० नोव्हेंबरला मतदान आणि २३ नोव्हेंबरला मतमोजणी होईल. नांदेड लोकसभा मतदारसंघाची पोटनिवडणूकही याच वेळापत्रकाप्रमाणे होणार आहे.

राज्यात २८८ पैकी २५ मतदारसंघ अनुसूचित जाती आणि २९ अनुसूचित जमातींसाठी राखीव आहेत. मतदार यादीत आतापर्यंत ९ कोटी ६३ लाखांहून अधिक मतदारांची नोंद झाली आहे. त्यात सुमारे ५ कोटी पुरुष आणि ४ कोटी ६६ लाखांहून अधिक महिला आहेत. सुमारे १ कोटी ८५ लाख हे २० ते २९ वयोगटातले मतदार आहेत. २० लाख ९३ हजारांहून अधिक मतदारांनी यंदा

पहिल्यांदाच मतदारयादीत नाव नोंदवलं आहे. कातकरी, कोलम, मारिया गोंड या विशेषतः आदिवासी जमातींमधल्या सर्व २ लाख ७७ हजार मतदारांची नोंद मतदार यादीत केल्याचं निवडणूक आयोगानं जाहीर केलं आहे.

राज्यात विधानसभेसाठी एकूण १ लाख १८६ मतदार केंद्र असतील. त्यातले ४२ हजार ६०४ शहरी आणि ५७ हजार ५८२ ग्रामीण भागात आहेत. सर्वाधिक ८ हजार ४१७ मतदान केंद्र पुणे जिल्ह्यात तर सर्वात कमी ९२१ मतदान केंद्र सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहेत.

**<><><><><>**

राज्यात उद्यापासून उमेदवारी अर्ज भरायला सुरुवात होणार असली तरी महायुती आणि महाविकास आघाडीतलं जागावाटप अजून स्पष्ट झालेलं नाही. भाजपाचे ९९ उमेदवार आणि अजित पवारांचे काही उमेदवार वगळता एकाही मोठ्या पक्षानं उमेदवार जाहीर केलेले नाहीत. वंचित बहुजन आघाडीनं ८३ उमेदवार जाहीर केले आहेत. परिवर्तन महाशक्तीचे १०, मनसेचे २ उमेदवार आतापर्यंत जाहीर झाले आहेत. MIM, समाजवादी पक्ष यांनीही काही उमेदवार जाहीर केले आहेत.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसने इगतपुरी मतदारसंघासाठी हिरामण खोसकर यांच्या उमेदवारीची घोषणा आज केली. पक्षाचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी याची माहिती देत खोसकर यांचं अभिनंदन केलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं विधानसभा निवडणुकांसाठी आपली पहिली यादी जाहीर केली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी कल्याण ग्रामीण

मतदारसंघातून राजू पाटील आणि ठाण्यातून अविनाश जाधव यांना उमेदवारी देण्यात आल्याची घोषणा केली आहे. डोंबिवलीत राजू पाटील यांच्या निवडणूक मध्यवर्ती प्रचार कार्यालयाचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते.

<><><><><>

परिवर्तन महाशक्तीने आगामी विधानसभा निवडणुकीसाठी १० उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. यापैकी ८ जागा प्रहार जनशक्ती पक्षाला आणि दोन जागा स्वाभिमानी शेतकरी संघटनेला देण्यात आल्या आहेत. प्रहार जनशक्ती पक्षाकडून बच्चू कडू यांना अचलपूरमधून तर अनिल चौधरी यांना रावेरमधून उमेदवारी देण्यात आली आहे. चांदवड विधानसभा मतदारसंघातून गणेश निंबाळकर, देगलूर बिलोलीमधून सुभाष साबणे, ऐरोलीमधून अंकुश कदम, हदगाव हिमायतनगरमधून माधव देवसरकर, हिंगोलीमधून गोविंदराव भवर, राजुरामधून वामनराव चटप यांना उमेदवारी जाहीर झाली आहे.

<><><><><>

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीकडून पाचवी यादी जाहीर झाली आहे. यात मुंबईतल्या ७ जागांचा समावेश आहे. जोगेश्वरी पूर्व मतदारसंघातून परमेश्वर रणशूर, दिंडोशीतून राजेंद्र ससाणे, मालाडमधून अजय रोकडे, अंधेरी पूर्वमधून संजीव कुमार कलकोरी, घाटकोपर पश्चिममधून सागर गवई तर पूर्वेतून सुनीता गायकवाड आणि चेंबुरमधून आनंद जाधव यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. त्याखेरीज ऐरोली, ओवळा माजिवडा, रिसोड, भुसावळ, मेहकर, मूर्तिजापूर, बारामती, श्रीगोंदा आणि उदगीर मतदारसंघांच्या उमेदवारांची घोषणा झाली आहे.

<><><><><>

काँग्रेसच्या केंद्रीय निवडणूक समितीची बैठक आज नवी दिल्लीत झाली. यावेळी महाराष्ट्रातल्या विधानसभा निवडणुकांविषयी चर्चा झाली. राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे, सोनिया गांधी, राहुल गांधी, के. सी. वेणुगोपाल यांच्यासह राज्यातले नेते उपस्थित होते.

**<><><><><>**

महाविकास आघाडीत ३०-४० जागांवर सहमती शिल्लक असून त्यावर उद्या मुंबईत शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्यासोबत चर्चा करणार असल्याचं काँग्रेसनं आज जाहीर केलं. काँग्रेसची ९६ जागांवरची चर्चा पूर्ण झाली आहे. उद्याच्या चर्चेनंतर उमेदवारांची यादी जाहीर करण्याचा प्रयत्न असेल, असं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितलं. नवी दिल्लीत ते वार्ताहरांशी बोलत होते. शिवसेना आघाडीतून बाहेर पडणार या बातम्यात काहीही तथ्य नाही, भारतीय जनता पक्ष जाणीवपूर्वक विरोधी पक्षांबद्दल गैरसमज पसरवण्याचे प्रयत्न करत आहे, असा आरोप त्यांनी केला. पराभवाच्या भितीने भाजपा अशी खेळी करत आहे. काँग्रेसकडूनही अशा पद्धतीचे कोणतेही विधान केलेले नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

याविषयी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले…

**होल्ड – वडेट्टीवार**

**<><><><><>**

भारतीय कम्युनिस्ट पक्षानं महाविकास आघाडीकडे ११ जागा मागितल्या आहेत. याविषयी चर्चा सुरू असून येत्या दोन दिवसात अंतिम निर्णय झाल्यानंतर उमेदवारांची घोषणा करू अशी माहिती पक्षाचे राष्ट्रीय सचिव डॉ. भालचंद्र कांगो

यांनी दिली. छत्रपती संभाजीनगर इथल्या औरंगाबाद मध्य विधानसभा मतदार संघातून विधिज्ञ अभय टाकसाळ यांच्या उमेदवारीची घोषणा त्यांनी आज केली.

<><><><><>

विधानसभा निवडणुकीसाठी रिपब्लिकन पक्षाला महायुतीकडे पाच ते सहा जागांची मागणी केल्याचं रिपाइंचे अध्यक्ष आणि केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी वार्ताहरांना सांगितलं. आठवले यांनी आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची मुंबईत त्यांच्या शासकीय निवासस्थानी भेट घेतली. यावेळी दोघांमध्ये जागावाटपाबाबत चर्चा झाली. रिपब्लिकन पक्षाला जागा सोडणं आवश्यक असून महायुतीच्या बैठकीत यावर निर्णय घेण्यात येईल, असं फडनवीस म्हणाल्याचं आठवले यांनी सांगितलं. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशीही याबाबत चर्चा झाल्याचं आठवले म्हणाले.

दरम्यान, महायुतीची सत्ता आल्यावर दोन ते तीन महामंडळांचं अध्यक्षपद, एक मंत्रिपद द्यावं अशी अपेक्षा आठवले यांनी व्यक्त केली. तसंच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही पक्षाला जागा द्याव्यात अशी मागणी त्यांनी केली आहे.

<><><><><>

काँग्रेसचे आमदार रविंद्र धंगेकर यांच्या हिंदमाता प्रतिष्ठानविरुद्ध आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

<><><><><>

राज्य विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध पक्षांच्या तसंच पक्षांशी संबंधित संघटनांच्या हालचालींना वेग आला आहे. महाराष्ट्र डेमोक्रेटिक फोरम द्वारे आज अकोल्यात विचार सभेचं आयोजन करण्यात आलं होतं. त्यात भारत जोडो

अभियानाचे नेते योगेंद्र यादव यांचं भाषण सुरु असताना वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी निषेधाच्या घोषणा देत सामानाची मोडतोड केली, आणि सभा उधळून लावली. पोलिसांनी याप्रकरणी काही आंदोलकांना ताब्यात घेतलं आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज **ठाणे** जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्यातल्या भामरागड तालुक्यात पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत ५ नक्षली ठार झाले. या चकमकीत एक पोलीस जखमी झाला असून त्याच्यावर गडचिरोली इथल्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. विधानसभा निवडणुकीत घातपाताचा कट रचण्यासाठी कोपर्शीच्या जंगलात नक्षलवादी एकत्र आल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यामुळे या भागात सी-६० पथकाच्या २२ तर केंद्रीय राखीव दलाच्या २ तुकड्यांनी नक्षलविरोधी अभियान राबवलं. या दरम्यान झालेल्या चकमकीत पाच नक्षलवादी ठार झाले असून त्यांची ओळख पटवण्याचं काम सुरू आहे.